Online

**मे. श्री ए. एम. पाटील**, दिवाणी न्यायाधिश क.स्तर, व
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे

Exh-5

**१३८ नमुना — १, अनुसूची — २, फौजदारी प्रक्रिया संहिता — ४**

प्रति,
पोलीस निरिक्षक, **घोडेगाव**
पोलीस ठाणे

**संक्षिप्त फौ.ख.क्रमांक : ६०६/२०२५**
तक्रारदार : श्री कुलस्वामी सोसायटी तर्फे
जगदीश रामदास अभंग

**आरोपीस समन्स**

प्रती,

**विशाल रामदास हगवणे**
रा. मु.पो. गिरवली गावठाण ता.आंबेगाव जि.पुणे

ज्या अर्थी, परक्राम्य लेख अधिनियम, १८८१ च्या कलम १३८ सह कलम १४१ खालील दोषारोप उत्तर देण्यासाठी आपली उपस्थिती आवश्यक आहे. (तक्रारीची प्रत यासोबत जोडलेली आहे.)

आपण व्यक्तिशः **दिनांक ०२/०२/२०२६** रोजी सकाळी ११.०० वाजता दिवाणी व फौजदारी न्यायालय घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे. समोर उपस्थित राहणे आवश्यक आहे. यात कसूर होऊ नये.

अधिक निर्देश मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुढीलप्रमाणे आहेत. :

अ) तुम्हास असे स्पष्ट करण्यात येत आहे की, खटल्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या सुनावणीच्या तारखेच्या दिवशी तुम्ही तडजोड करण्यासाठी अर्ज करु शकता आणि जर असा अर्ज करण्यास आल्यास, तुमच्यावर कोणताही खर्च न लादता न्यायालय तडजोडीस मान्यता देउ शकेल.

ब) जर आपण वरीलप्रमाणे तडजोडीसाठी अर्ज केला नाही आणि जर असा तडजोडीचा अर्ज दंडाधिकारी यांच्यासमोर सुनावणीच्या पहिल्या किंवा दुसऱ्या तारखेनंतर केल्यास, तुम्हाला धनादेशावरील रक्कमेच्या १०% रक्कम खर्च म्हणून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे अथवा न्यायालयास योग्य वाटेल अशा प्राधिकरणात जमा करण्याच्या अटीवर कोर्ट तडजोड करण्यास परवानगी देऊ शकते.

क) तसेच, जर तडजोडीचा अर्ज सत्र न्यायालय व उच्च न्यायालयासमोर पुनरीक्षण अथवा अपील या मध्ये केला असेल, तर तुम्हाला धनादेशावरील रक्कमेच्या १५% रक्कम खर्च म्हणून भरण्याच्या अटींवर तडजोडीस मान्यता देण्यात येऊ शकेल.

ड) अंतिमतः जर तडजोडीसाठीचा अर्ज मा. सर्वोच्च न्यायालयासमोर केला असेल, तर हा आकडा धनादेश रक्कमेच्या २०% इतका वाढेल.

याप्रमाणे, वरील मार्गदर्शक तत्वांस अनुसरुन लादलेला खर्च ज्या न्यायालयासमोर तडजोड करण्यात येते अशा न्यायालय पातळीवर काम करणाऱ्या विधी सेवा प्राधिकरणात खर्च म्हणून भरावा लागेल. उदाहरणार्थ, जेव्हा दंडाधिकारी यांच्या न्यायालयासमोर वा सत्र न्यायालयासमोर खटला प्रलंबित असेल, तेव्हा अशा तडजोड प्रकरणी खर्च जिल्हा विधी सेवा प्राधिकरणात जमा करावा लागेल. त्याचप्रमाणे, उच्च न्यायालयासमोरील तडजोडीच्या संबंधात लादलेला खर्च राज्य विधी सेवा प्राधिकरणात भरावा लागेल, आणि मा. सर्वोच्च न्यायालयासमोरील तडजोडीच्या संबंधात लादलेला खर्च राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणात भरावा लागेल.

आज, **दिनांक. ०४/१२/२०२५** रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

हुकूमावरुन

सहायक अधिक्षक,
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे.

हजावणी विशाल रामदास

[signature] 17/12/2025

मा. सविनय सादर

सदर समन्सची बजावणी मुदतीत केली आहे.

मसलो. धवे

[signature]

सवारय